# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** लक्ष्मीनगर झोन अंतर्गत प्रभाग क्र. १६ धंतोली परिसरातील
**{सा.बां.वि. झोन क्र. ०१}** रस्त्यांचे डांबरीकरण करण्याबाबत रु. ७५,२९,६६१ /- (रु. पंच्याहत्तर लक्ष एकोन्तीस हजार सहाशे एकसष्ठ फक्त) रकमेचे प्राकलन पद क्र. **A**२२००१३३०८०३ अंतर्गत विभागाद्वारे तयार केलेले आहे. सदर्हू रु. ७५,२९,६६१ /- रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच हे काम निविदा मागवून हाती घेण्याचा तसेच पद क्र. **A**२२००१३३०८०३ अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप :-**

१. प्रस्तावित काम हे पद क्र. **A**२२००१३३०८०३ अंतर्गत प्रस्तावित असुन सदर्हू कामास सन २०२४-२५ च्या आर्थिक वर्षात, सदर्हू पदा अंतर्गत राशी रु. ७५,२९,६६१ /- चे प्रावधान प्राप्त आहे.

२. या कामास मा. अधिक्षक अभियंता यांनी SE/PWD/T.S./३६८/२०२४-२५ दि. ११/०३/२०२५ अन्वये तांत्रीक मान्यता प्रदान केलेली आहे.

३. सविस्तर टिप्पणी नस्तीत आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 13/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 06/04/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लक्ष्मीनगर झोन क्र. ०१ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार लक्ष्मीनगर झोन अंतर्गत प्रभाग क्र. १६ धंतोली परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याबाबत रु. ७५,२९,६६१ /- (रु. पंच्याहत्तर लक्ष एकोन्तीस हजार सहाशे एकसष्ठ फक्त) रकमेचे प्राकलन पद क्र. **A**२२००१३३०८०३ अंतर्गत विभागाद्वारे तयार केलेले आहे. सदर्हू रु. ७५,२९,६६१ /- रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच हे काम निविदा मागवून हाती घेण्याचा तसेच पद क्र. **A**२२००१३३०८०३ अंतर्गत तरतुद मुक्त करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.